मुंबईतील तीन रेल्वे स्थानकांचा विकास

मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांची माहिती

प्रवेशद्वार स्थानकाचे की, अतिक्रमणांचे

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

रेल्वे स्थानकांतील वाढत्या गर्दीच्या नियोजनासाठी रेल्वे स्थानके प्रवासी पूरक करण्यासाठी अमृत भारत स्थानक योजना सुरू आहे. स्थानक योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबईतील परळ, कांजुरमार्ग आणि विक्रोळी या तीन स्थानकांत सुधारणा करण्यात येणार आहे. देशातील ५०८ रेल्वे स्थानकांचा विकास करण्यात येणार आहे, असे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश लालवाणी यांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्सने 'रेल्वे स्थानकांची वहिवाट' मालिकेअंतर्गत मुंबईतील सर्व रेल्वे स्थानकांचे वास्तव मांडले होते. मध्य, हार्बर, पश्चिम रेल्वेसह ट्रान्सहार्बर मार्गावरील शंभराहून अधिक स्थानकांना प्रत्यक्ष भेट देऊन असुविधेच्या छायाचित्रांसह बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. प्रवाशांसह प्रवासी संघटनांनीदेखील या वृत्तमालिकेला मोठा प्रतिसाद दिला. यंदाच्या अर्थसंकल्पात अमृत भारत स्थानक योजनेतील घोषणा करण्यात आली होती. त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पातच निधीची तरतूद करण्यात आली आहे. मध्य रेल्वेवरील ३८ रेल्वे स्थानकांसह राज्यातील ४४ रेल्वे स्थानकांचे आणि देशातील ५०८ रेल्वे स्थानकांच्या कामांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून भूमिपूजन करणार आहेत. सध्या स्थानकांचे आराखडे निश्चित झाले असून लवकरच प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येणार आहे.

असा होणार खर्च

विक्रोळी स्थानकाच्या विकासासाठी १९.५१ कोटी, परळसाठी सुमारे १७.९२ कोटी आणि कांजुरमार्ग स्थानकासाठी २६.५८ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. येत्या चार महिन्यांत अर्थात डिसेंबर २०२३अखेर सर्व स्थानकांची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

स्थानकांत होणारा विकास

- सुगम्य भारत अभियानांतर्गत फलाटांवर लिफ्ट, सरकते जिने
- व्हिडीओ सुविधेसह प्रवासी माहिती यंत्रणा
- स्वच्छतागृहांची सुधारणा
- नवे आधुनिक दिशादर्शक फलक
- सांडपाणी प्रक्रिया केंद्र
- स्थानक परिसरात बगीच्यांची निर्मिती
- तुटलेल्या पायऱ्या, लाद्या निघालेले फलाट सुधारणे
- अद्ययावत सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणा

अमली पदार्थ विक्रेत्यांची धरपकड; आठ जण अटकेत

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबई : मुंबई गुन्हे शाखा आणि अमली पदार्थविरोधी पथक यांनी कांदिवली, वांद्रे आणि माहीम परिसरात शोधमोहीम घेत आठ ड्रग्जविक्रेत्यांची धरपकड केली. अटक केलेल्या आरोपींमध्ये तीन महिला आहेत. या आठ जणांकडून ३५ लाखांचे एमडी ड्रग्ज आणि पाच लाखांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

मुंबई पोलिसांच्या वतीने अमली पदार्थमुक्त मुंबई अभियानांतर्गत धडक कारवाई हाती घेण्यात आली आहे. अमली पदार्थविरोधी पथकाच्या वांद्रे युनिटच्या अधिकाऱ्यांनी माहीम आणि वांद्रे परिसरात विविध ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. या छाप्यात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या पाच जणांना ताब्यात घेण्यात आले. झडतीमध्ये त्यांच्याकडे सुमारे ३० लाख रुपयांचे एमडी ड्रग्ज सापडले. या विक्रेत्यांना ड्रग्जपुरवठा नेमका कुठून केला जातो, याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. गुन्हे शाखा युनिट १२च्या पथकाने कांदिवली परिसरात छापेमारी करीत ड्रग्जविक्री करणाऱ्या तीन महिलांची धरपकड केली. पोलिसांनी या तीन महिलांकडून सुमारे पाच लाखांचे एमडी ड्रग्ज आणि पाच लाखांपेक्षा अधिकची रक्कम हस्तगत केली.

दर्शनाच्या नावाखाली भाविकांची फसवणूक

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील प्रसिद्ध देवस्थान असलेल्या सिद्धिविनायक गणेशाचे ऑनलाइन नोंदणीद्वारे प्रत्यक्ष दर्शन उपलब्ध करून देतो, असे सांगून भाविकांकडून पैसे आकारून फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. ऐन संकष्टीच्या आदल्या दिवशी काही भाविक देवळात आले त्यावेळी 'उत्सव' नावाने चालविणाऱ्या अॅपवरून ही फसवणूक केली जात असल्याची माहिती मिळाली. भाविकांची अशाप्रकारे आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी सिद्धिविनायक न्यासाच्या वतीने दादर पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

'उत्सव' अॅप चालविणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिरात देश-विदेशातून भाविक दर्शनासाठी येत असतात. अनेकांना प्रत्यक्षात दर्शनासाठी येणे शक्य होत नाही अशा भाविकांना न्यासाच्या वतीने अधिकृत संकेतस्थळ आणि सिद्धिविनायक अॅपवरून ऑनलाइन दर्शन आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. १ ऑगस्ट रोजी सिद्धिविनायक न्यासाच्या पदाधिकाऱ्यांकडे एक लिंक आली. ही लिंक उघडल्यावर 'उत्सव' नावाच्या अॅपवर सिद्धिविनायक गणपतीचा फोटो दिसला. त्यावर देणगी, ऑनलाइन पूजा तसेच इतर पर्याय उपलब्ध होते. यावर न्यासाच्या माध्यमातून चौकशी सुरू असतानाच दुसऱ्या दिवशी काही भाविक प्रसाद मागणीसाठी मंदिरात आले. त्यांच्याकडे पैशाबाबत विचारणा केली असता त्यांनी 'उत्सव' अॅपवरून ऑनलाइन दर्शन आणि पूजा केली असून प्रसाद मंदिरात मिळेल असे सांगितले. यासाठी पैसेही ऑनलाइन पाठविल्याचे हे भाविक म्हणाले. ही भाविकांची फसवणूक असल्याने या प्रकाराची गंभीर दखल न्यासाने घेतली.

अधिकृत संकेतस्थळ पहावे...

सिद्धिविनायक न्यासाच्या पर्यवेक्षकांनी 'उत्सव' अॅपबाबतची माहिती पोलिसांना दिली. न्यासाबरोबरच भाविकांचीदेखील ही फसवणूक असल्याने याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. या तक्रारीवरून दादर पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान कायदा आणि फसवणुकीच्या कलमांतर्गत 'उत्सव' अॅप चालविणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सिद्धिविनायक बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ किंवा अॅपचा वापर करावा, असे आवाहन न्यासाने केले आहे.

पाण्याच्या टाकीत तरुणाचा मृतदेह

मुंबई : जोगेश्वरी पश्चिमेकडील एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या आवारातील पाण्याच्या टाकीत एका तरुणाचा मृतदेह सापडला. या तरुणाच्या अंगावर मारहाणीचे व्रण असल्याने हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेह येथे टाकण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

एस. व्ही. सर्व्हिस रोडवरील टाकरे पुलाजवळ २१ मजली इमारतीचे बांधकाम सुरू आहे. गुरुवारी प्लम्बिंगचे काम करण्यासाठी एका प्लम्बरला बोलाविण्यात आले होते. प्लम्बर काम करण्यासाठी सिमेंटच्या टाकीमध्ये उतरला असता त्याला पाण्यामध्ये एक मृतदेह आढळला. हा मृतदेह कुजलेल्या स्थितीत होता.

कर्मचाऱ्याने याबाबतची माहिती ओशिवरा पोलिसांना दिली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलिसांनी हत्या आणि पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरीमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

(अ) सेहेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ-पश्चात) आणि (ब) लाभांशासाठी रेकॉर्ड तारीख, यासंबंधी माहिती

कंपनी कायदा, २०१३ आणि त्या अंतर्गत बनविण्यात आलेले नियम व सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स् अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") द्वारा जारी करण्यात आलेल्या लागू परिपत्रकांसोबत वाचले असता, एजीएम बोलाविण्याच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले कामकाज करण्यासाठी कंपनीच्या सदस्यांची सेहेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ-पश्चात) ("एजीएम") व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर ऑडिओव्हिज्युअल माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम") द्वारे **सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी भाप्रवेळ दुपारी २.०० वाजता** होईल.

कंपनी/केफिनटेक/डिपॉझिटरी सहभागी/डिपॉझिटरीज यांच्याकडे ज्यांचे ई-मेल पत्ते नोंदविण्यात आले आहेत अशा कंपनीच्या सदस्यांना, एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२२-२३ चे स्वतंत्र व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरण, त्याचप्रमाणे संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यासोबत जोडण्याचे इतर दस्तऐवज, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येतील. एजीएमची सूचना आणि वर नमूद करण्यात आलेले दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर म्हणजे बीएसई लिमिटेड ("बीएसई") आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ("एनएसई") यांच्या वेबसाईटवर अनुक्रमे **www.bseindia.com** येथे आणि **www.nseindia.com** येथे आणि कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ("केफिनटेक") यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध करण्यात येतील.

ई-मेल पत्ता नोंदविण्याची/त्यात सुधारणा करण्याची पद्धती:

(अ) ज्यांनी कंपनीकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्त्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, आवश्यक पूरक दस्तऐवजांसह योग्य प्रकारे भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रपत्र आयएसआर-१ (जे कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध आहे) केफिनटेक यांना सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद ५०० ०३२, येथे सादर करून त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

(ब) ज्यांनी डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्त्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा डिमटेरियलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांचे डिमॅट खाते जेथे आहे अशा डिपॉझिटरी सहभागींकडे त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदान पद्धतीने मतदान करण्याची प्रक्रिया:

सदस्य एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे ("ई-मतदान") त्यांचे मतदान करू शकतील. डिमटेरियलाईज्ड आणि प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या आणि ज्यांनी त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी केली नाही अशा समभाग धारण करणाऱ्या सदस्यांसाठी आणि प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांसाठी दूरस्थ पद्धतीने मतदान ("रिमोट ई-मतदान") करण्यासह मतदानाच्या पद्धतीची माहिती एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे. ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे एजीएमला उपस्थित राहणारे सदस्य एजीएमच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ("इन्स्टा पोल") मतदान करू शकतील.

व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएममध्ये सहभागी होणे:

सदस्य जिओमीट द्वारा https://jiomeet.jio.com/rilagm येथे व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमला उपस्थित राहू शकतील. येथे वापरण्याची लॉगइनची माहिती आणि एजीएमला उपस्थित राहण्याचे टप्पे यासंबंधी माहिती एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे.

लाभांशासाठी रेकॉर्ड तारीख आणि त्याचे वितरण

(अ) कंपनीने ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी, संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लाभांशासाठी सदस्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी **सोमवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२३** ही **'रेकॉर्ड तारीख'** निश्चित केली आहे.

(ब) ज्यांची नावे रेकॉर्ड तारखेला कंपनीच्या सदस्यांच्या रजिस्टरमध्ये आहेत अशा सदस्यांना आणि डिमटेरियलाईज्ड स्वरूपातील समभागांच्या बाबतीत नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड यांनी रेकॉर्ड तारखेला लाभार्थक धारक म्हणून ज्यांची नावे सादर केली आहेत अशा सदस्यांना एजीएम पूर्ण झाल्यानंतर एक आठवड्याच्या आत लाभांशाचे पैसे देण्यात येतील.

(क) ज्यांनी कंपनीकडे त्यांच्या बँकेचा तपशील नोंदविला आहे अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश देण्यात येईल. ज्यांनी त्यांच्या बँकेचा तपशील नोंदविलेला नाही अशा सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर लाभांशाचे वॉरंट पाठविण्यात येईल.

लाभांश स्वीकारण्यासाठी नोंदणी करण्याची बंधनकारक पद्धती:

सदस्यांना त्यांच्या बँकेच्या संपूर्ण तपशीलाची यांच्याकडे नोंदणी / सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे

(अ) डिमटेरियलाईज्ड स्वरूपात समभाग धारण केले असल्यास ज्यांच्याकडे त्यांचे डिमॅट खाते आहे अशा त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींकडे, डिपॉझिटरी सहभागींना आवश्यक असलेले प्रपत्र आणि दस्तऐवज सादर करावेत, आणि

(ब) प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण केले असल्यास आवश्यक पूरक दस्तऐवजांसह योग्य प्रकारे भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रपत्र आयएसआर-१ केफिनटेक यांच्याकडे त्यांच्या वरील पत्त्यावर सादर करावे.

सदस्यांना एजीएमची सूचना काळजीपूर्वक वाचण्याची, खास करून, एजीएममध्ये सहभागी होणे, दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान करणे किंवा एजीएममध्ये मतदान करणे यासंबंधी सूचना वाचण्याची, विनंती करण्यात येत आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाने
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि
कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ५ ऑगस्ट, २०२३

www.ril.com

Navneet Education Limited

Registered Office : Navneet Bhavan, Bhavani Shankar Road, Dadar (West), Mumbai - 400 028.
Tel. : 022-6662 6565 • **Fax** : 022-6662 6470, **email** : secretarial@navneet.com • www.navneet.com **CIN** : L22200MH1984PLC034055

EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2023

(INR in Lakhs, except Earnings Per Share)

Particulars	Standalone Result				Consolidated Result			
	Quarter Ended			Year Ended	Quarter Ended			Year Ended
	30.06.2023 (Unaudited)	30.06.2022 (Unaudited)	31.03.2023 (Unaudited) (Refer note 3)	31.03.2023 (Audited)	30.06.2023 (Unaudited)	30.06.2022 (Unaudited) (Restated)	31.03.2023 (Unaudited) (Refer note 3)	31.03.2023 (Audited)
Revenue from operations	78,493	68,278	35,950	1,62,768	79,145	69,374	40,902	1,69,683
Other income	393	474	509	1,715	352	423	425	1,474
Total income	78,886	68,752	36,459	1,64,483	79,497	69,797	41,327	1,71,157
Profit before tax, Share of Profit/(Loss) of associates and Exceptional items	21,206	20,167	3,948	30,977	19,192	18,661	3,993	24,304
Share of profit/(Loss) of associates					719	1,856	(673)	(816)
Exceptional items (Refer note no. 4 for Standalone result and note no. 5 for Consolidated result below)	–	–	2,404	3,037	–	–	–	6,409
Profit for the period/year (after tax and share of Profit/(Loss) of associates and Exceptional Items)	15,790	14,972	5,294	25,887	14,494	15,232	2,294	20,376
Other Comprehensive Income/(Loss) (Net of tax)	165	(1,105)	795	49	166	(1,103)	4,630	3,889
Total Comprehensive Income for the period/year (Total of profit after tax and other comprehensive income for the period/year)	15,955	13,867	6,089	25,936	14,660	14,129	6,924	24,265
Equity Share Capital (of INR 2/- each)	4,524	4,524	4,524	4,524	4,524	4,524	4,524	4,524
Other Equity				1,30,734				1,10,507
Earnings Per Share (of INR 2/- each) (not annualised)								
1. Basic	6.98	6.62	2.34	11.44	6.41	6.77	1.01	9.04
2. Diluted	6.98	6.62	2.34	11.44	6.41	6.77	1.01	9.04

Notes : (1) The results were reviewed by the audit committee and taken on record by the Board of Directors at its meeting held on 3rd August, 2023. The statutory auditors have carried out limited review of the Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter ended 30th June, 2023. (2) In view of seasonal nature of business, above quarterly financial results are not representative of the operations of the whole year. (3) The figures of the quarter ended 31st March, 2023 are the balancing figures between audited figures in respect of the full financial year and published year-to date figures upto the quarter ended 31st December, 2022 which were subjected to limited review. (4) Exceptional items represents : a) For the quarter and year ended 31st March, 2023, INR 2,404 Lakhs towards reversal of provision made for impairment of investment in wholly owned subsidiaries based on valuation reports obtained from registered valuers. b) For the year ended 31st March, 2023, INR 633 Lakhs towards profit on sale of property. (5) Exceptional items for the year ended 31st March, 2023 represent : i) INR 633 Lakhs towards profit on sale of property. ii) INR 5,776 Lakhs for profit on dilution of the Group's share from an associate company (deemed disposal). (6) Financial results for the quarter ended 30th June, 2023 of two associate companies 'K12 Techno Services Private Limited' and 'Carveniche Technologies Private Limited', one foreign subsidiary 'Navneet (HK) Limited' and one subsidiary entity 'Navneet Learning LLP' have been considered based on the unaudited financial results which are not subjected to limited review by their statutory auditors. (7) The above is an extract of the detailed format of Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter ended 30th June, 2023 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of Standalone and Consolidated Unaudited Financial Results for the quarter ended 30th June, 2023 are available on www.navneet.com and Stock Exchange website www.bseindia.com and www.nseindia.com.

FOR **Navneet Education Limited**

Sd/-
GNANESH D. GALA
MANAGING DIRECTOR (DIN : 00093008)
MUMBAI, 3rd August, 2023

Visit us at : www.navneet.com

NAVNEET

बृहन्मुंबई महानगरपालिका

मुख्य अभियंता (पूल) विभाग
क्र. मुख्य अभि/६०००/पूल, दि. ०४.०८.२०२३

ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई सागरी किनारा मार्ग प्रकल्प उत्तर-वर्सोवा ते दहिसर च्या बांधकामाकरिता सुविख्यात, बहुआयामी अभियांत्रिकी संस्थांकडून म्हणजे प्रख्यात संस्था, प्रोप्रायटरी/भागिदारी संस्था / खाजगी मर्यादित कंपनी / सार्वजनिक मर्यादित कंपनी / भारतीय कंपनी अधिनियम २०१३ अन्वये नोंदणीकृत कंपनी, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे (बीएमसी) नवीन नोंदणीप्रमाणे खालील परिशिष्टात दर्शविलेल्या श्रेणीत नोंदलेले कंत्राटदार किंवा केंद्र किंवा राज्य शासन / निम शासकीय संस्था / केंद्र किंवा राज्य सार्वजनिक क्षेत्र उपक्रम येथे समतुल्य किंवा अधिक कामाचे अनुभवी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा मागवित आहे, परंतु जे कंत्राटदार बीएमसीकडे नोंदणीकृत नसतील त्यांनी कंत्राट मिळाल्यावर तीन महिन्यांच्या कालावधीत त्यांची संस्था नोंदणीकरिता अर्ज करावा, अन्यथा त्यांची निविदा सुरक्षा रकम म्हणजे इसारा (इरठे) जप्त केली जाईल / कंत्राटामधून १% दंड किंवा रु. १०००० वसूल केला जाईल, जो अधिक असेल तो, संबंधित विभागाद्वारे कंत्राटदाराची प्रदान रक्कम / बीलमधून वसूल / केली जाईल. निविदा प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडेल.
मुंबई सागरी किनारा मार्ग प्रकल्प-उत्तर वर्सोवा ते दहिसर चे बांधकाम ६ (सहा) पॅकेजेसमध्ये समाविष्ट आहे व त्याचा तपशील खालील परिशिष्टात दाखविला आहे.

अ. क्र.	पॅकेज	कामाचे नाव	निविदा आयडी/ देकार क्र.	श्रेणी	इरठे (रु.)	कंत्राटाचा कालावधी	निविदा सुरक्षा शुल्क (रु.)
१	पॅकेज ए	वर्सोवा ते बांगूर नगर (चैनेज चै. ०+००० ते चै. ४+५४०)	2023_MCGM_ 930187_1	श्रेणी १ (ए) व अधिक	२५,००,००,०००	४८ महिने (मानसून सहित)	२५,००० + १८% जीएसटी
२	पॅकेज बी	बांगूर नगर ते माईंड स्पेस मालाड आणि जीएमएलआर कनेक्टर (वर्सोवा दहिसर सागरी किनारा मार्ग चैनेज चै ४+५४० ते चै ६+२००) व (जीएमएलआर कनेक्टर चैनेज : चै ०+००० ते चै ४+४६०)	2023_MCGM_ 930190_1	श्रेणी १ (ए) व अधिक	२५,००,००,०००	४८ महिने (मानसून सहित)	२५,००० + १८% जीएसटी
३	पॅकेज सी	माईंड स्पेस मालाड ते चारकोप-उत्तरेकडील बोगदा (चैनेज : चै. ६+२०० ते चै १०+१००)	2023_MCGM_ 930191_1	श्रेणी १ (ए) व अधिक	२५,००,००,०००	४८ महिने (मानसून सहित)	२५,००० + १८% जीएसटी
४	पॅकेज डी	चारकोप ते माईंडस्पेस मालाड - दक्षिणेकडील बोगदा (चैनेज : चै ११+००० ते चै ७+१००)	2023_MCGM_ 930193_1	श्रेणी १ (ए) व अधिक	२५,००,००,०००	४८ महिने (मानसून सहित)	२५,००० + १८% जीएसटी
५	पॅकेज ई	चारकोप ते गोराई (चैनेज : चै ११+००० ते चै १४+७८०)	2023_MCGM_ 930194_1	श्रेणी १ (ए) व अधिक	२५,००,००,०००	४८ महिने (मानसून सहित)	२५,००० + १८% जीएसटी
६	पॅकेज एफ	गोराई ते दहिसर (चैनेज : चै १४+७८० ते चै १८+४७०)	2023_MCGM_ 930196_1	श्रेणी १ (ए) व अधिक	२५,००,००,०००	४८ महिने (मानसून सहित)	२५,००० + १८% जीएसटी

निविदा जारी करण्याचा दिनांक (प्रारंभ दिनांक)	७ ऑगस्ट २०२३ रोजी १६.०० वाजता
निविदा पूर्व बैठक	११ ऑगस्ट २०२३ रोजी १५.०० वाजता (कॉन्फरन्स हॉल, २ रा मजला, अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांचे कार्यालय, मुख्यालय, विस्तारित इमारत, बीएमसी)
निविदा विक्रीचा अंतिम दिनांक व वेळ	११ सप्टेंबर २०२३ रोजी १६.०० वाजता
ई-लिफाफा ए मध्ये कागदपत्रे व ई-लिफाफा बी मध्ये तांत्रिक सादरीकरण करण्याचा अंतिम दिनांक व वेळ	११ सप्टेंबर २०२३ रोजी १७.०० वाजता
ई-लिफाफा सी मध्ये वाणिज्यिक देकार तसेच संपूर्ण सादरीकरण अपलोड करण्याचा दिनांक व वेळ	११ सप्टेंबर २०२३ रोजी १७.०० वाजता
ई-लिफाफा ए व तांत्रिक ई-लिफाफा बी उघडण्याचा दिनांक व वेळ	१३ सप्टेंबर २०२३ रोजी ११.०० वाजता
ई-निविदा, ई-लिफाफा सी उघडण्याचा दिनांक व वेळ	२० सप्टेंबर २०२३ रोजी ११.०० वाजता (मुख्य अभियंता (पूल), वरळी यांच्या कार्यालयात)
संपर्क ई-मेल	che.br@mcgm.gov.in

निविदा प्रत महाराष्ट्र शासनाचे प्रोक्यूरमेंट पोर्टल **https://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करता येईल.

PRO/1196/ADV/2023-24

सही/- ०४.०८.२०२३
मुख्य अभियंता (पूल)

जलजन्य आजार टाळण्यासाठी पाणी गाळून व उकळून प्यावे.